# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई :४००००१.

**दूरध्वनी-** २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०,/५१ **फॅक्स नं.**२६९२१०२

**तार-** EDUTECH E_mail desk7@dte.org.in internet :- http://www.dte.org.in

क्रमांक : ७/तंशिसं/अनुदान/अंदानिवे/२००९/७
दिनांक : १४.०१.२००९

प्रति,

१. प्राचार्य,
अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतने
व तत्सम पदवी/पदविका संस्था

२. कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड ४०२ १०३

३.प्राचार्य,
सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,
मुंबई

विषय : राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१ ऑक्टोबर २००५

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दि.१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय क्र.अंनियो १००७/१८/सेवा-४ दि.७ जूलै ०७ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे. सदर निर्णयातील क्र.२८ नुसार ही कार्यपध्दती जिल्हा परीषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषी विद्यापीठे इत्यादींमधील कर्मचा-यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहिल असे नमूद केलेले आहे.

सदर योजना संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांमधे दि.१ नोव्हेंबर ०५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना लागू करावयाची असून त्या संबंधीचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा आहे. तरी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असणारी माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरुन दि.२७.०१.०९ पर्यंत संचालनालयास सादर करण्यात यावी.

सा.अ.रायकर

(सा.अ.रायकर)
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक ८, मुख्य कार्यालय, मुंबई

# विवरणपत्र

*संस्थेचे नाव :*

| अ.क्र. | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे | पदाचा संवर्ग | पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

दि.१.११.०५ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे देण्यात यावी.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी | नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

संस्था प्रमूखांची सही